सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२६-२७/४०८ दि. १९/१०/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी
संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.

**विषय : विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ अंतर्गत दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधीची मुदतवाढ व त्यानिमित्त विशेष मतदार जागृती व नोंदणी उपक्रमाबाबत.**

**संदर्भ क्र : १. मा. उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. १७, पुणे यांचे पत्र क्र. उप.जि.भू.सं/१७/निवडणूक-१/कावि/३६/२०२६ दि. १६/१०/२०२६ रोजीचे पत्र.**

**२. मा. मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कडील पत्र क्र- ई.एल.आर २०२६/प्र.क्र.१०६/नि-६ दि. १५ ऑक्टोबर, २०२६ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

वरील संदर्भीय पत्रानुसार, मा. उपजिल्हाधिकारी तथा स्वीप नोडल अधिकारी, पुणे यांचे दि. ३०/०९/२०२६ रोजीच्या पत्रानुसार, भारत निवडणूक आयोगाने राज्यातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमाला मुदतवाढ दिली असून, त्यानुसार **दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी दि. २६ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत वाढविण्यात आला आहे.** या वाढीव कालावधीचा प्रभावी वापर करून, राज्यातील प्रत्येक पात्र नागरिकांचे नाव मतदार यादीत अचूकपणे नोंदविले जावे या उद्देशाने खालीलप्रमाणे विशेष मतदार जागृती व नोंदणी उपक्रम राज्यभर राबविण्याकरीता येत आहेत या हेतूनेच आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागांनी सर्व नव मतदारांपर्यंत विशेषतः आपल्या माध्यमातून पोहोचणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने महाविद्यालयांमध्ये खालीलप्रमाणे विशेष मतदार नोंदणी शिबीरांचे आयोजन करण्यात यावे.

१. आपल्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागातील १०० टक्के विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी होण्याच्या उद्देशाने महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना (NSS) च्या स्वयंसेवकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी विशेष मतदार नोंदणी शिबिरे आयोजित करावीत.
२. सदर शिबीराकरीता महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेत (NSS) कार्यरत विद्यार्थ्यांना व त्यांच्या माध्यमातून सर्वच विद्यार्थ्यांना ECINET App व voters.eci.gov.in वर मतदारांची नावे तपासणे व त्यांच्याकडून ऑनलाईन पद्धतीने नमुना क्र. ६ व ८ भरण्याबाबतचे प्रात्यक्षिक देण्यात यावीत.
३. दि. १ ऑक्टोबर, २०२६ या अर्हता दिनांकास वय वर्षे १८ पूर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी झालेली आहे किंवा नाही, याची प्रत्यक्ष खातरजमा (प्रारूप मतदार यादीत त्यांचे नाव आहे किंवा नाही) करावी.
४. ज्या विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी झालेली नसल्यास त्यांचा ऑनलाईन नमुना क्र. ६ भरून घ्यावा.
५. इतर विधानसभा मतदारसंघांमधून/इतर जिल्ह्यांमधून महाविद्यालयांमध्ये शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांची नोंदणी शक्यतो ऑनलाईन नमुना ६ मध्ये भरून घ्यावी. ऑफलाईन नमुना ६ मध्ये नोंद केलेले अर्ज, त्यांच्या मूळ निवासाच्या पत्त्यानुसार जिल्ह्यांतर्गत संबंधित विधानसभा मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे पाठवावेत. तर जिल्ह्याबाहेरील अर्ज असल्यास ते संबंधित जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांचेकडे ४८ तासांत वर्ग करण्याची कार्यवाही संबंधित मतदार नोंदणी अधिकारी/सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांनी करावी. इतर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे नमुने कोणत्याही परिस्थितीत अस्वीकृत करण्यात येऊ नयेत. व यासंदर्भातील अहवाल या पत्रासोबतच्या **विवरणपत्र-१ मध्ये संबंधित मतदार संघातील मतदार नोंदणी अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी** यांचेकडे सादर करावा.

६. प्रत्येक महाविद्यालयामध्ये सर्व विद्यार्थ्यांच्या याद्यांवर सविस्तर नोंदी ठेवाव्यात व त्यांचा परिपूर्ण अहवाल या पत्रासोबतच्या **विवरणपत्र-२ मध्ये** त्यांच्या कार्यालयास सादर करावा. (सोबत संदर्भिय पत्र जोडले आहे.)

तसेच याबाबत घेण्यात आलेली शिबिरे यांचे फोटो व आकडेवारी या कार्यालयाकडून पाठवलेल्या स्प्रेडशीट भरणे अनिवार्य आहे. **तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल jdhepune@gmail.com या इमेल आयडी वर व खाली दिलेल्या गुगल फॉर्म लिंक वर त्वरित पाठवण्यात यावे. असे मा. उपजिल्हाधिकारी तथा स्वीप नोडल अधिकारी, पुणे यांचे निर्देश प्राप्त झाले आहेत.**

त्याअनुषंगाने विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी वाढविण्यात आला असून त्यानिमित्त विशेष मतदार जागृती व नोंदणी उपक्रमाबाबत आयोजित करण्यात येणाऱ्या नवमतदारांची ऑनलाईन नोंदणीची सूचना महाविद्यालयातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्याकरीता आपल्या महाविद्यालय/परिसंस्थातील मुख्य सूचनाफलकांवर तसेच जिथे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी एकत्र येत असतात (उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह /उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनी भागात प्रदर्शित करून सर्व विद्यार्थ्यांना निदर्शनास आणून देऊन महाविद्यालय/परिसंस्था/विभागाच्या स्तरावर नवमतदारांची ऑनलाईन नोंदणीची मोहीम राबविण्यात यावी.

सदर उपक्रम विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, सांस्कृतिक अधिकारी व संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था/विभागातील उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना सूचित करण्यात यावे. कळावे, ही विनंती.

**सोबत : वरीलप्रमाणे.**

SSKulkarni.

**(डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन ) क्र.१७,पुणे यांचे कार्यालय

जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, बी. विंग ,पुणे

E Mail ID- sloa17pune@gmail.com

क्र.उपजिभूसं/१७ /निवडणूक-1/कावि/ ३६ /२०२६ दि. १६/१०/२०२६

प्रति,

१.मा. कुलसचिव
सावित्रीबाई फुले विद्यापिठ पुणे

२.भारती विद्यापिठ , पुणे

३.यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठ , पुणे

४.एम. आय. टी. पुणे

५.डी. वाय. पाटील, पुणे

**विषय:- विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम -२०२६**
**मतदार नोंदणी करिता विशेष शिबिरे आयोजित करणेबाबत.**

**संदर्भ:-१) मा. मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कडील पत्र क्र ईएलआर २०२६/प्र.क्र १०६/नि-६ दिनांक ०९/०९/२०२६.**

**२) मा. मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कडील पत्र क्र- ईएलआर २०२६/प्र.क्र.१०६/नि-६ दि.२९.०९.२०२६**

**४) या कार्यालयाकडील पत्र क्र.** उपजिभूसं/१७ /निवडणूक-1/कावि/२६/२०२६ दि. ३०/०९/२०२६

**५) मा. मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कडील पत्र क्र- ईएलआर २०२६/प्र.क्र.70/नि-६ दि. १२. १०.२०२६**

**६) या कार्यालयाकडील पत्र क्र.** उपजिभूसं/१७ /निवडणूक-1/कावि/३५/२०२६ दि. १३/१०/२०२६

**७) मा. मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कडील पत्र क्र- ईएलआर २०२६/प्र.क्र.१०६/नि-६ दि. १५. १०.२०२६**

उपरोक्त वरील संदर्भिय पत्राचे अवलोकन करण्यात यावे संदर्भ क्र. **७** च्या पत्रान्वये उपरोक्त विषयाबाबत मा. भारत निवडणूक आयोगाने दिनांक-१२/१०/२०२६ च्या पत्रान्वये विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केलेले आहे. त्यानुसार दावे व हरकती सादर करण्यासाठी दिनांक-३१/०८/२०२६ ते २६/१०/२०२६ अशी मुदतवाढ दिलेली असून, अंतिम मतदार यादी दिनांक-१६/११/२०२६ रोजी प्रसिद्ध करावयाची आहे.

विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अंतर्गत मतदार नोंदणी करीता सर्व मतदान केंद्रांवर विशेष नोंदणी शिबीरे आयोजित करण्याबाबत दिनांक ०९.०९.२०२६ च्या पत्रान्वये आपणांस कळविण्यात आले होते. त्यानुसार संपूर्ण राज्यामध्ये सर्व मतदान केंद्रावर विशेष नोंदणी शिबीरे आयोजित करण्यात आलेली आहेत. आता, भारत निवडणूक आयोगाने दावे व हरकती सादर करण्याकरीता देण्यात आलेली दिनांक २६.१०.२०२६ पर्यंतची मुदतवाढ

विचारात घेवून, जास्तीत जास्त नागरीकांना / नव मतदारांना आपली नावे मतदार यादी मध्ये नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने दिनांक १७, १८, २४ व २५ ऑक्टोबर, २०२६ (शनिवार/रविवार) या दिवशी सर्व मतदान केंद्रांवर विशेष नोंदणी शिबीरे आयोजित करण्यात येणार आहेत

त्याअनुषंगाने ज्या विद्यार्थ्यांचे वय १८ वर्षे पूर्ण झालेली आहेत आणि त्यांची मतदार म्हणून नाव नोंदणी होऊ शकलेली नाही अशा युवकांची मतदार नोंदणी करण्याकरिता आपल्या अधिनस्त सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना सूचना देणेत याव्यात, जनजागृती करुन नव युवा नागरिकांची नावे जास्तीत जास्तपणे मतदार म्हणून नोंदविता येतील यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत.

( अमित तळेकर )
उपजिल्हाधिकारी तथा
स्वीप नोडल अधिकारी ,पुणे

प्रत:- 1.मा. मुख्य निवडणूक अधिकारी , महाराष्ट्र राज्य, मुंबई यांजकडे माहितीस्तव सविनय सादर.

2.मा.विभागीय आयुक्त , पुणे विभाग पुणे ( सामान्य प्रशासन विभाग ) यांजकडे सविनय सादर.

3.उपजिल्हा निवडणूक अधिकारी , पुणे यांचेकडे माहितीसाठी.

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक- ईएलआर २०२६/प्र.क्र.१०६/निवडणूक-६
सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा रोड हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०२६.

प्रति,
१) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर.
२) सचिव, मराठी भाषा विभाग तथा मतदार यादी निरीक्षक, मुंबई शहर व मुंबई उपनगर.
३) विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक, कोकण विभाग (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून).
४) सर्व अतिरीक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर.
५) सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून).

विषय: विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-२०२६
मतदार नोंदणी करीता विशेष शिबिरे आयोजित करणेबाबत.

संदर्भ : १) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक- २३/२०२५-ERS (Vol-II), दिनांक १४.०५.२०२६.
२) या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दि.०४.०९.२०२६ व ०९.०९.२०२६.
३) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक- २३/२०२५-ERS (Vol-II), दिनांक १२.१०.२०२६

महोदय/महोदया,

भारत निवडणूक आयोगाने दिनांक १२.१०.२०२६ च्या पत्रान्वये विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहिर केलेले आहे. त्यानुसार दावे व हरकती सादर करण्यासाठी दिनांक ३१.०८.२०२६ ते २६.१०.२०२६ अशी मुदतवाढ दिलेली असून, अंतिम मतदार यादी दिनांक १६.११.२०२६ रोजी प्रसिध्द करावयाची आहे.

२. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अंतर्गत मतदार नोंदणी करीता सर्व मतदान केंद्रांवर विशेष नोंदणी शिबीरे आयोजित करण्याबाबत दिनांक ०९.०९.२०२६ च्या पत्रान्वये आपणांस कळविण्यात आले होते. त्यानुसार संपूर्ण राज्यामध्ये सर्व मतदान केंद्रावर विशेष नोंदणी शिबीरे आयोजित करण्यात आलेली आहेत. आता, भारत निवडणूक आयोगाने दावे व हरकती सादर करण्याकरीता देण्यात आलेली दिनांक २६.१०.२०२६ पर्यतची मुतदवाढ विचारात घेवून, जास्तीत जास्त नागरीकांना/ नव मतदारांना आपली नावे मतदार यादी मध्ये नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने दिनांक १७, १८, २४ व २५ ऑक्टोबर, २०२६ (शनिवार/रविवार) या दिवशी सर्व मतदान केंद्रांवर विशेष नोंदणी शिबीरे आयोजित करण्यात यावीत.

३. दिनांक ०९.०९.२०२६ च्या पत्रान्वये यासंदर्भात देण्यात आलेल्या सर्व सूचना उपरोक्त दिवशी आयोजित करण्यात येणाऱ्या विशेष नोंदणी शिबीराकरीता लागू राहतील. याबाबतचा नियमित अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा, ही विनंती.

आपला,

(प्रशांत आ. नावगे)
अवर सचिव व उप मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य.

प्रत :

सर्व उप जिल्हा निवडणूक अधिकारी.